**समक्ष अध्यक्ष, मोटार अपघात प्रकरणे न्यायाधिकरण, वर्धा**
**एम.ए.सी.पी (एम.ए.एन.आर.जे.आय.) क्र. ५२/२०२६**
**बिमलादेवी इंदरचंद शर्मा व ३ –वि.– निरंक**

**आदेश नि. क्र. १ वर पारित**
**दिनांक १८/०७/२०२६**

मोटार अपघात दावा प्रकरण क्र. ३२/१९९२ दिनांक ३१/०१/१९९६ रोजी निकाली काढण्यात आले. सदर प्रकरणातील आदेशावर गैरअर्जदार क्र. १ व ५ यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपुर येथे पहिले अपील क्र. ३१८/१९९६ नुसार अपील केले. सदर अपील दिनांक १६/०४/२०१२ रोजी निकाली काढण्यात आले. सदर अपील प्रकरणात जमा केलेली रक्कम रुपये २२,०००/– (अक्षरी रुपये बावीस हजार फक्त) ही मा. प्रबंधक उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपुर यांचे कडुन डी.डी. व्दारे प्राप्त झाली आहे. ती रक्कम मिळण्याकरीता मुळ प्रकरणातील अर्जदार क्र. १ बिमलादेवी इंदरचंद शर्मा, अर्जदार क्र. २ विजय इंदरचंद शर्मा, अर्जदार क्र. ३ ज्योती इंदरचंद शर्मा, (लग्नानंतरचे नाव सौ. ज्योती सुधिर शर्मा) व अर्जदार क्र. ४ राजेश इंदरचंद शर्मा यांनी सदर अर्ज केलेला आहे.

सदर प्रकरणात मुळ प्रकरणातील अर्जदार क्र. ३ ज्योती इंदरचंद शर्मा हीने पैसे मागणीचे अर्ज करतेवेळी तिचे नाव ज्योती सुधिर शर्मा असे लिहले आहे. त्याबाबत मुळ प्रकरणातील अर्जदार क्र. ४ राजेश इंदरचंद शर्मा यांनी अर्जदार क्र. ३ ही माझी बहीन असुन तिचे लग्नाअगोदरचे नाव ज्योती इंदरचंद शर्मा व लग्नानंतरचे नाव ज्योती सुधिर शर्मा असल्याबाबत नि. क्र. ६ अन्वये शपथपत्र दाखल केले आहे तसेच नि. क्र. ७ अन्वये अर्जदाराचा शाळा सोडल्याचा दाखल व मार्कशीट ची प्रत दाखल केली आहे.

उपरोक्त मोटार अपघात प्रकरण ३२/१९९२, पहिले अपील क्र. ३१८/१९९६ मधे रक्कम रुपये २२,०००/– (अक्षरी रुपये बावीस हजार फक्त) ही मा. प्रबंधक उच्च न्यायालय मुंबई, खंडपिठ नागपुर यांचे कडुन डी.डी. व्दारे प्राप्त झाली असुन सदर रकमेची अर्जदार यांनी उचल न केल्यामुळे सदर रक्कम अध्यक्ष, मोटार अपघात प्राधिकरण, वर्धा यांचे नावाने भारतीय स्टेट

बॅक शाखा ट्रेझरी वर्धा येथे एफ.डी.आर. खाता क्र. ३२८१८६१६८६५ दिनांक ०९.०२.२०१३ नुसार जमा असुन तिची मुदत दिनांक १९/०३/२०१९ नुसार संपली असल्याबाबतचा अहवाल नि. क्र. ५ अन्वये वरिष्ठ लिपीक (मोटार अपघात), रोख व वित्त विभाग, जिल्हा न्यायालय, वर्धा यांनी दिलेला आहे.

प्रकरणांतील निकालाचे आदेशाविरुध्द मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपुर येथे पहिले अपील क्र. ३१८/१९९६ नुसार अपील झाले असुन सदर अपील दिनांक १६/०४/२०१२ रोजी निकाली काढण्यात आले असल्याबाबतचा अहवाल संबंधित लिपीक यांनी दिलेला आहे. मुळ अभिलेखाची पडताळणी केली असता अर्जदाराने प्रकरणांत आवश्यक असलेली संपूर्ण कोर्ट फी भरलेली आहे. वरील मुदत ठेव पावतीची परिपक्वता झालेली आहे. तसेच मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपुर यांनी सदर अपील मधे जमा केलेली रक्कम मोटार अपघात दावा प्राधिकरण वर्धा यांना पाठवुन ती अर्जदार यांना देण्याबाबत निर्देशित केले आहे. मुळ प्रकरणातील अर्जदार क्र. ५ सुंदराबाई रामजिवनजी शर्मा यांचा दिनांक ०९/०१/२००२ ला मृत्यु झाला आहे तसेच त्यांचे नाव अपीलमध्ये कमी करण्यात आले आहे. व सुंदराबाईचे वारस वरील अर्जदार क्र. १ ते ४ असल्याबाबत नि. क्र. १ मधे अर्जदार यांनी शपथपत्राव्दारे कळविले आहे.

वरील सदर मुद्द्यास अनुसरून मा. उच्च न्यायालय हिमाचल प्रदेश, शिमला यांनी CPM (M) No. 181 of 2025 in FAO No. 35 of 2025 Balak Ram Vs. Leela Devi & others order dated 16.06.2025 या प्रकरणात पारीत केलेला आदेश पाहणे योग्य होईल, ज्यात मा. उच्च न्यायालयाने ठरविलेले आहे की,

In Claim Petition, like present one, either under MACT or Employees Compensation Act or any other similar enactment or statute, where parent(s) is or are also claimants and entitled for compensation on account of death of son/daughter, and children and wife of deceased persons are also claimants and entitled for compensation awarded or to be awarded, there compensation awarded or to be awarded in favour of parent(s), on death of parent(s) has not to be disbursed amongst all legal heirs of parent(s), but has to be disbursed amongst surviving legal heirs/representatives of deceased person for whose death compensation is awarded. Because in such claim cases, compensation is awarded on account of dependency upon the deceased. It is not a property or estate inherited by the parent(s) including

mother by way of succession or otherwise but is a compensation awarded being dependent legal heirs/representatives of deceased person. Therefore, in such cases, subject to availability of Class-1 legal heirs of deceased-victim, amount of compensation, fallen in share of parent(s) of deceased-victim is to be disbursed amongst eligible Class-1 legal heirs of deceased-victim on account of whose death compensation is determined and awarded, but not to the Class-1 legal heirs/representatives of deceased claimant parent(s). Parents are claimants in such cases being dependent on their deceased child, which impliedly means that other children were not looking after them and, therefore, the compensation is awarded to such parent(s). On death of parent(s), other children of such parent(s) do not deserve any payment of amount out of the compensation, payable or paid or awarded to parent(s) on account of their brother or sister, whose eligible Class-1 legal heirs/legal representatives are already available for disbursement/payment of such compensation amount. Therefore, I am of the considered opinion that amount of compensation awarded to the parent(s), if not disbursed to and/or utilized by parent(s), has to be remitted back to eligible Class-1 legal heirs/representatives of deceased victim for whose death compensation has been awarded.

त्यामुळे मा. उच्च न्यायालयाचे वरीलप्रमाणे निर्णयास अनुसरून, मुळ प्रकरणातील मय्यत अर्जदार क्र. ५ सुंदराबाई रामजीवनजी शर्मा यांचे हिश्याची रक्कम मुळ प्रकरणातील अर्जदार क्र. १ ते ४ यांना समप्रमाणात देता येईल.

करिता खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१. मुळ प्रकरणातील अर्जदार क्र. १ बिमलादेवी इंदरचंद शर्मा, अर्जदार क्र. २ विजय इंद्ररचंद शर्मा, अर्जदार क्र. ३ ज्योती इंदरचंद शर्मा (लग्नानंतरचे नाव सौ. ज्योती सुधिर शर्मा) व अर्जदार क्र. ४ राजेश इंदरचंद शर्मा यांना एफ. डी. आर. खाता क्र. ३२८१८६१६८६५ मधे जमा असलेली रक्कम **रुपये २२,०००/- (अक्षरी रुपये बावीस हजार फक्त)** पैकी रक्कम रुपये **५,५००/- (अक्षरी रुपये पाच हजार पाचशे फक्त)** प्रत्येकी व्याजासह त्यांचे पडताळणीअंती प्रदान करण्यांत यावी. याप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येतो.

HEMANT BHAGWANTRAO GAIKWAD
Digitally signed by HEMANT BHAGWANTRAO GAIKWAD
Date: 2026.07.18 17:41:37 +0530

दिनांकः १८/०७/२०२६

(हिमंत भ. गायकवाड)
अध्यक्ष,
मोटार अपघात प्रकरण न्यायाधिकरण,वर्धा